NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २९.१०.२०२६ गुरूवार

(कामगिरी)

१) परिमंडळ क्र. ४ अंतर्गत सराईत अवैध दारू विक्रेती महिला हद्दपार :–

परिमंडळ क्र. ४ अंतर्गत पोलीस ठाणे अजनी हद्दीत **गल्ली नं. ०४, रामटेके नगर, अजनी, नागपूर येथे राहणारी महिला गुन्हेगार नामे नंदा उर्फ सुनंदा गौतम मेश्राम, वय ५३ वर्षे** हिचेविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे अवैद्य दारू विक्री करण्याचे १३ गुन्हे दाखल असुन, तीचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही तीचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. महिला गुन्हेगार हिला यापुर्वी सन २०१७ तसेच, सन २०१९ मध्ये असे दोन वेळा हद्दपार करण्यात आले होते. नमुद महिला गुन्हेगार हिचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता अजनी पोलीसांनी तीचेविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. २३/२०२६ दिनांक २७.१०.२०२६ अन्वये गुन्हेगार महिलेस नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०१ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे. हद्पार महिलेस त्यांचे नातेवाईकाडे डोंगरगाव, जि. गोंदीया येथे सोडण्यात आलेले आहे.

२) एमआयडीसी पोलीसांची कामगीरी :– वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १८.१०.२०२५ चे ०७.०० वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, काळमेघ नगर, देवनारायण पांडेचे घरी किरायाने राहणारे फिर्यादी नामे गौरव गिरीश दुरूतकर, वय २६ वर्षे यांनी त्यांची काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर प्लस दुचाकी गाडी क्र. एम.एच ४० बि.एम ६६७१ किंमती अंदाजे ३५,०००/–रू. ची आपले घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, एमआयडीसी पोलीसांना खात्रीशीर माहीती मिळाली की, महेंद्र सोनवणे नावाचे ईसमाकडे असलेली मध्यप्रदेश पासींग ची दुचाकी विक्रीकरीता तो ग्राहक शोधत आहे. अशा माहीतीवरून महेंद्र खेमराज सोनवणे, वय २६ वर्षे, रा. पाऊळदौना, फुकामेटा, तह. आमगांव, जि. गोंदीया, ह.मु.– वैशाली नगर, टॉवर लाईन, बिसेन चे घरी किरायाने, तह. हिंगणा, जि. नागपुर यास एका दुचाकीसह ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने नमुद वाहन चोरीचे असल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरीचे गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी केलेले वाहन तसेच, हिरो स्प्लेंडर क्र. एम.पी ५० एम.यु ७५९७ किंमती ५०,०००/–रू. चे असे एकुण ०२ मोटारसायकली किंमती ८५,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. बाबुराव राऊत, दुपोनि.

पुरूषोत्तम देवकर, सपोनि. गजानन काठेवाडे, पोउपनि. पंकज सयाम, पोहवा. प्रमोद गिरी, प्रमोद सोनवणे, प्रविण फलके, विक्रांत देशमुख, पोअं. किरण शेजवळ व किरण इंगळे यांनी केली.



३) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :– म.को.का. अंतर्गत गुन्ह्यातील टोळी प्रमुख फरार आरोपीस अटक.

पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १०९(१), ११८(१), ३०९(४), ३५२, ३(५) भा.न्या.सं. सहकलम कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा– १९९९ (म.को.का.) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्यातील आरोपींपैकी टोळी प्रमुख आरोपी नामे मोबीन अहमद वल्द समसुद्दीन अहमद, वय ३७ वर्षे, रा. नुरी मस्जीद जवळ, संघर्ष नगर, यशोधरानगर, नागपुर यास मा. न्यायालयाकडून (दिनांक १६.१०.२०२५) अटकपुर्व जामीन मिळालेला होता. आरोपीने मा. न्यायालयाच्या अटी व शर्तींचे वारंवार उल्लंघन केल्यामळे जिल्हा व सत्र न्यायालय क्र. ०१, विशेष न्यायालय (म.को.का.), नागपूर यांनी आरोपीचा जामीन अधिकृतपणे दिनांक ०७.०७.२०२६ रोजी रद्द केला होता. जामीन रद्द झालेपासून आरोपी हा स्वत:चे अस्तीत्व लपवुन फरार होता. आरोपीचे शोधार्थ त्याचा पाठपुरावा करीत असता, यशोधरानगर पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस ट्रान्सपोर्ट नगर, वर्धमाननगर येथून दिनांक २९.१०.२०२६ रोजी त्यास ताब्यात घेतले आहे. पुढील योग्य कार्यवाही सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहित ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख व तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



४) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :– एम.डी. पावडर बाळगणाऱ्या पाहीजे आरोपीस अटक.

दिनांक २४.०९.२०२६ चे २०.२० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी खात्रीशीर माहीतीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत एका काळ्या रंगाचे स्कॉर्पीयो कारमध्ये

बसलेला ईसम नामे ईजाजउद्दीन सिद्दीकी वल्द रियाजउद्दीन सिद्दीकी, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १४७, हमीद नगर, कब्रस्तान जवळ, यशोधरानगर, नागपूर याचेजवळुन अंमली पदार्थ एकुण ५८ ग्राम ६०० मि.ग्राम एम. डी. पावडर मिळून आल्याने, गुन्हा दाखल करून, अटक करण्यात आली होती. नमुद गुन्ह्यात आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद एम.डी पावडर ही त्याचे साथीदार पाहीजे आरोपी नामे १) अमीर मुकीम मलीक व त्याचा भाऊ २) करीम मुकीम मलीक, दोन्ही रा. प्लॉट नं. २५८, हमीद नगर, नागपुर यांची असल्याचे सांगुन, तो तसेच, त्याचे साथीदार पाहीजे आरोपी क्र. ३) शिबु मलीक, ४) कैफ मलीक, दोन्ही रा. टेका, पाचपावली, नागपुर ५) सागर मोहम्मद लतीफ अन्सारी, रा. एकता कॉलोनी, यशोधरानगर, नागपुर ६) ओसामा, रा. गरीब नवाज नगर, नागपुर असे सर्वजण मुकीम व करीम यांचेकरीता एम.डी. पावडर विक्री करीत असल्याचे सांगीतले होते. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २२(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासादरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोहवा. ईमरान शेख यांना गुप्त बातमीदारमार्फतीने माहीती मिळाली की, वर नमुद गुन्ह्यातील पाहीजे मुख्य आरोपी अब्दुल करीम वल्द मोहम्मद मुकीम मलीक हा एका काळ्या रंगाचे टाटा हॅरीयर कार क्र. एम.एच ४८, सि.सि १४१४ ने कन्हान–कामठी मार्गे नागपुर येथे येत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत ड्रॅगन पॅलेस टर्निंग येथील जुना बोगदा येथे सापळा रचुन, नमुद वाहनाची वाट पाहत असता, प्राप्त वर्णनाचे वाहन दिसुन आल्याने, बॅरीगेटींग चे सहायाने थांबविण्याचा ईशारा केला असता, वाहन चालकाने त्याचे वाहन न थांबवता, लोकांचे जिवीतास धोका होईल असे बेदरकारपणे वाहन पळविले. पोलीसांनी वाहनाचा पाठलाग करीत असता, नमुद वाहन महामेट्रोचे बॅरीगेटला धडकुन पलटी झाले. पोलीसांनी अपघातग्रस्त वाहनातुन वाहनचालक तथा ईतर दोन जणांना बाहेर काढुन त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नांवे १) अब्दुल करीम वल्द मोहम्मद मुकीम मलीक, वय ३३ वर्षे, रा. प्लॉट नं. २५८, हमीद नगर, यशोधरानगगर, नागपुर, वाहनचालक नामे २) मोहम्मद शारीक मोहम्मद राजीक, वय ३३ वर्षे, रा. प्लॉट नं. १३१, वांजरा ले–आऊट, पिवळी नदी, यशोधरानगर, ३) गुलाम यशदाणी वल्द मोहम्मद राशीद अन्सारी, वय २६ वर्षे, रा. फारूख नगर, टेका, पाचपावली, नागपुर असे सांगीतले. कारचालक आरोपीविरूध्द नविन कामठी येथे कलम २८१ भा.न्या.सं. सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून, त्यास नविन कामठी पोलीसांचे तसेच वर नमुद गुन्ह्यातील पाहीजे आरोपी अब्दुल करीम वल्द मोहम्मद मुकीम मलीक यास ताब्यात घेवुन, पुढील कार्यवाहीस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोहवा. इम्रान शेख, ज्ञानेश्वर भोगे, गणेश जोगेकर, पोअं. संतोष शेंद्रे व नितीन राठोड यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे नंदनवन :—शस्त्र बाळणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २९.१०.२०२६ चे ०१.५० वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, नंदनवन कॉलोनी, निलम पान पॅलेस जवळ एक इसम संशयास्पदरित्या दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे पंकज उर्फ चिलचिल्या सुरेश शिंदे, वय ३२ वर्षे, रा. गल्ली नं. १३, नंदनवन झोपडपट्टी, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी धारदार चाकु किंमती ५००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धारदार चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. संतोष चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. प्रदीप होळगे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे सदर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ११.०९.२०२६ चे १४.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे मोहम्मद अहफाज मोहम्मद जाहीद, वय १५ वर्षे, रा. पिवळी नदी, शिवाजी चौक, संभाजी नगर, यशोधरानगर, नागपुर हा त्याचा शेजारी राहणारा मित्र नामे समिर मोहम्मद शाकीर शेख, वय २० वर्षे याचेसह त्याचे बजाज केटीएम दुचाकी क्र. एम.एच. ४० डि.एम ३१९८ ने राहते घरून गेले होते. पोलीस ठाणे सदर हद्दीतील एलआयसी चौक ते कामठीकडे जाणारे उड्डाणपुलावर पोल क्र. पि/१६५—१६६ दरम्यान त्यांचा अपघात झाल्याने ते दोघे गंभीर जखमी अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले होते. **याप्रकरणी सदर पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती.**

अकस्मात मृत्युचे चौकशीमध्ये नमुद केटीएम दुचाकी चालक समीर मोहम्मद शाकीर शेख याने त्याचे ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने उड्डाणपुलावरील डिव्हायडरचे भिंतीला धडक लागल्याने त्यांचा अपघात झाल्याचे निष्पन्न झाले. तसेच, दुचाकी चालकाचा हलगर्जीपणा फिर्यादीचे मुलाचे मृत्युस कारणीभुत झाला. अशा फिर्यादी मोहम्मद जाहीद मोहम्मद इसराईल, वय ५५ वर्षे, रा. पिवळी नदी, शिवाजी चौक, संभाजी नगर, यशोधरानगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे सपोनि. दिगांबर राठोड ८८३०८७०९०६ यांनी केटीएम चालकाविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ७, नागपुर.	२२१/२०२६	कलम १०९(१), ३२४(४), १८९ भा.न्या.सं.	मोहम्मद अयुब मोहम्मद अकील शेख उर्फ राजा हिरोती, रा. प्लॉट नं. ६१३, कामगार नगर, कमर कॉलोनी,	३०.१०.२०२६

				भोलाराम दुकानजवळ, कपीलनगर, नागपुर.	
२	मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश–२ तथा अती. सत्र न्यायाधिश, नागपुर.	१९५/२०२६	कलम ३५३, १४३, १४७, १४८, १४९, ३३२, ३३६, ३४१, ४२७ भा. दं.वि.	१) राजु केशवराव रामटेककर, वय ३३ वर्षे, रा. टिमकी, तिनखंबा चौक, तहसिल, नागपुर. २) सुरेश गोविंदराव पराते, वय २३ वर्षे, रा. केंद्रीय विद्यालय, नवाबपुरा, कोतवाली, नागपुर.	०२.११.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.